10

RNI MAHMAR
36829-2010

ISSN - 2229-4929

**Peer Reviewed**

# Akshar Wangmay

## ernational Research Journal

**UGC-CARE LISTED**



## RETHINKING MAHATMA GANDHI IN PRESENT CONTEXT

February 2020

[redacted]

[redacted]

[redacted]

318

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | नाशिक शहरातील मॅनेजमेन्टच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून महात्मा गांधींच्या शिक्षणाबद्दलच्या विचारांची कालानुरूपता | डॉ. स्मिता कचोळे | १६३.१७२ |
| ३२ | महात्मा गांधी की आदर्श ग्राम संकल्पना | प्रा. प्रकाश विठ्ठल सोनवणे | १७३.१७६ |
| ३३ | महात्मा गांधीच्या विश्वस्त संकल्पनेचे विश्लेषण | डॉ. ग्यानदेव उपाडे | १७७.१८२ |
| ३४ | महात्मा गांधी यांची मोक्ष संकल्पना | डॉ. मुबीन शेख | १८३.१८५ |
| ३५ | गांधी तत्वज्ञानातील स्त्री स्वातंत्र्य: एक तात्विक अभ्यास | प्रा. मनोज उत्तमराव पाटील | १८६.१८९ |
| ३६ | पर्यावरणीय नीतिशास्त्र आणि गांधीवादी दृष्टीकोण | प्रा. अनघा पाध्ये–देशमुख | १९०.१९६ |
| ३७ | गांधी ते महात्मा गांधी : गांधीच्या जडणघडणीत ग्रंथाचा प्रभाव | प्रा. डॉ. शीला गोडबोले – पाईकराव | १९८.२०३ |
| ३८ | गांधीजी का ग्राम स्वराज चिन्तन वर्तमान परिप्रेक्ष्य में..... | प्रो. डॉ. लोकेश जैन | २०४.२१८ |
| ३९ | महात्मा गांधींवरील पाश्चात्य विचारवंतांचा प्रभाव: लिओ टॉलस्टॉय, जॉन रस्किन आणि हेन्री डेविड थोरो | डॉ. तानाजी पोळ | २१९.२२३ |
| ४० | हिन्दी नाट्य–साहित्य में अभिव्यक्त गांधीवाद | प्रा. डॉ. प्रकाश कृष्णदेव धुमाल | २२४.२३२ |
| ४१ | गांधीवाद का हिन्दी पद्य (कविता) पर प्रभाव | प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | २३३.२३९ |
| ४२ | गांधी विचारांची विश्वात्मकता | श्री. जयवंत प्रभाकर बोधले | २४०.२४३ |
| ४३ | स्वदेशी : अहिंसक जीवनदृष्टी | प्रा. शितल रुद्रमुनी येरुळे | २४४.२४७ |
| ४४ | महात्मा गाँधी – एक युग पुरुष | प्रो. अंजना विजन | २४८.२५२ |

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

# पर्यावरणीय नीतिशास्त्र आणि गांधीवादी दृष्टीकोण

**प्रा. अनघा पाध्ये–देशमुख**
तत्त्वज्ञान विभाग
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय,पालघर
anaghamdesh@gmail-com

**प्रस्तावना :**

२१ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात पाऊल टाकणारा मानव प्रदूषणाच्या समस्येने घेरलेला आहे तसाच तो धास्तावलेलाही आहे. मग तो विकसित देशाचा, विकसनशील देशाचा किंवा अविकसित देशाचा नागरिक असो, त्याला प्रदूषणाच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. चुकीची अर्थनीती, चुकीची उद्योग्निती, चुकीची विकासनीती आणि मर्यादित नैसर्गिक संसाधनांचा हव्यासापोटी विकसनशील देशांनी व बलाढ्य राजसात्तांनी केलेला प्रचंड वापर यामुळे पृथ्वी या ग्रहावरील जीवनाला आवश्यक असणारी परिस्थिती मानवाच्या हातून निसटून पृथ्वी एक स्फोटक ग्रह बनली आहे. या संकटाची व त्यातून मानवासहित सजीव प्राणी नष्ट होण्याच्या भीतीने सबंध जग भयभीत झाले असून त्यावर उपाय म्हणून पर्यावरणीय नीतिशास्त्राचा अभ्यास आणि त्यातील निष्कर्षांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पावले पडत आहेत. त्या दृष्टीने पर्यावरणीय नीतिशास्त्र मानव जातीसाठी कसे उपयुक्त आहे व महात्मा गांधींसारख्या दृष्ट्य पुरुषाने त्यावर कसे विचार मांडले आहेत त्याचा थोडक्यात मागोवा या पेपरच्या निमित्ताने घेण्यात येत आहे.

**पर्यावरण नीतिशास्त्र:**

नीती हा संस्कृत शब्द असून नी म्हणजे घेऊन जाणे, मार्गदर्शन करणे होय. म्हणून जीवन कसे न्यावे हे सांगते ती नीती. त्यामुळेच नीती म्हणजे जगण्याची रिती. अशा नीतीचे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र होय. नीती व्यक्ती व समाज यांच्या सर्वमान्य वर्तनाचे निकष स्पष्ट करते. हि नीती व त्यावरून आलेले नियम बदलणारे व न बदलणारे असतात. उदाहरणार्थ चोरी करू नये, दिलेला शब्द पाळावा, संकटात सापडलेल्याला मदत करावी, असत्य भाषण करू नये हे न बदलणारे नीती नियम होत. तर स्त्रियांना शिक्षण देऊ नये, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था यांचे पालन करावे असे काही नियम हे



320

**Akshar Wangmay(International Research Journal)**
**UGC CARE Journal**
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
**National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context**
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

बदलणारे नीती नियम होत. हे नियम वैज्ञानिक प्रगती, सामाजिक धारणा, गरजा यानुसार बदलतात. सद्य परिस्थितीमध्ये काय योग्य आहे व काय अयोग्य आहे यानुसारही त्यांच्यात बदल होत जातो. त्यामुळे हे नियम कायम नव्या नैतिक निकषांच्या शोधात असतात. नव्या परिस्थितीत काय योग्य, चांगले, आवश्यक आहे हे नीतिशास्त्र शोधत असते. यावरून नितीशास्त्राच्या काही सध्या सोप्या व्याख्या करता येतात. सदाचरणाचे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र. कर्तव्यांचे पालन करणारे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र. प्राप्तव्यांचे निर्धारण करणारे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र. यावरून नीतिशास्त्राचे पडणारे प्रकार म्हणजे नैतिक आदर्शांचे केवळ वर्णन करणारे ते वर्णनात्मक नीतिशास्त्र, व्यक्ती आणि समाज कोणत्या आदर्शांनुसार चालवा ते सांगणारे ते आदर्शात्मक नीतिशास्त्र, नैतिक संकल्पनांचे विश्लेषण व परिक्षण करणारे ते अधिनितीशास्त्र आणि प्रत्यक्ष जीवन जगताना येणाऱ्या नैतिक समस्यांवर प्रकाश टाकणारे, त्या सोडविण्यासाठी नैतिक सिद्धांत व तत्वज्ञानात्मक पद्धतींचे उपयोजन करणारे ते उपयोजित नीतिशास्त्र होय.

विश्लेषक तत्त्वज्ञानामुळे नीतीच्या क्षेत्रात नवा विचार सुरु झाला. तसेच बदलत्या जगाने, महायुद्धांनी, विज्ञान–तंत्रज्ञानाधारित प्रगतीने, नवीन आर्थिक धोरणे, बदलती जीवनशैली, मूल्यव्यवस्था, यशस्वितेचे निकष या सगळ्यातून अनेक नैतिक प्रश्न निर्माण झाले. यातून गुंतागुंतीची, आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली. मानवी जगण्याचे अनेक नवे पैलू त्यातून समोर आले. ते सोडविण्यासाठी तज्ञ, नीतीचे अभ्यासक, तत्त्ववेत्ते, सामाजिक सुधारक यांच्या सहकार्याची व मार्गदर्शनाची गरज भासू लागली. यातूनच उपयोजित नीतिशास्त्र आकाराला आले. उपयोजित नीतिशास्त्र जसजसे विकसित होऊ लागले तसतसे प्रत्येक क्षेत्राचे नीतिशास्त्र आकाराला आले. उदाहरणार्थ राजकारणाचे, व्यवसायाचे, समाजकारणाचे, उद्योगसमुहाचे, वैद्यकशास्त्राचे, पर्यावरणाचे नीतिशास्त्र इत्यादी. या ठिकाणी पर्यावरणीय नीतिशास्त्राचा विचार मी करणार आहे.

## पर्यावरण नीतिशास्त्र आणि त्याचे दृष्टीकोण :

पर्यावरणीय नीतिशास्त्र पृथ्वीशी, विश्वाशी, निसर्गाशी मानवाच्या असलेल्या संबंधाची चर्चा करते. मानव आणि निसर्ग यांच्यातील नैतिक संबंध काय हा विचार पर्यावरणाचे नीतिशास्त्र करते. ते मानव आणि परिसर यांच्या नात्याचा शोध घेते. पर्यावरणवाद हे पर्यावरणविषयक व्यापक सामाजिक चळवळी, विविध सिद्धांत, प्रणाली यांचा समावेश असलेले व्यापक स्वरूपाचे तत्वज्ञान आहे. पर्यावरण नीतिशास्त्र हा पर्यावरण तत्वज्ञानाचा भाग आहे. नितीविचारांची कक्षा केवळ मानव प्राण्यापुरती मर्यादित न ठेवता मानवेतर सजीवानाही त्यात सामावून घेण्याएवढी व्यापक करावी हा मध्यवर्ती विचार त्यापाठीमागे आहे. अशा व्यापक नैतिकतेचा आग्रह धरणारी हि उपयोजित तत्वज्ञानाची शाखा आहे.

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

पर्यावरण–नैतिकतेचे मूलत: तीन दृष्टिकोण आहेत. पहिला म्हणजे मनुष्य हि पृथ्वीवरील एक प्रभावी महत्त्वपूर्ण प्रजाती आहे. मानवाने स्वत:च्या लाभासाठी निसर्गामध्ये फेरफार करून त्याचा वापर केला. हा मानवकेंद्री विचार आहे कारण यात सर्व व्यवस्थेच्या केंद्रस्थानी मानव आहे. म्हणून हा मानवकेंद्री दृष्टीकोण होय.

दूसरा म्हणजे आपल्या भावी पिढ्यांप्रती जबाबदार राहणे हे मानवाचे नैतिक कर्तव्य आहे. पर्यावरणावर, निसर्गावर मानवाचे अस्तित्व अवलंबून आहे. हा जीवनकेंद्री दृष्टीकोण होय.

तिसरा म्हणजे सर्व साजीवांप्रती सद्‌भावना बाळगणे व त्यांच्या प्रति, पर्यावरणाप्रति श्रद्धा, सन्मान व नैतिक जबाबदारीचे भान असणे होय. हा परीतान्त्र केंद्री अथवा पर्यावरण केंद्री दृष्टीकोण होय. पर्यावरणाचे व पर्यायाने मानव जातीचे रक्षण करणे हि मुलभूत गरज आहे. जर मानवाला जिवंत राहायचे असेल तर पर्यावरण वाचविणे हि काळाची गरज आहे.

पर्यावरण नीतिशासत्राचे महत्व खालील मुद्द्यांच्या सहाय्याने अभ्यासता येईल.

(१) विविध प्रकारचे प्रदूषण
(२) नैसर्गिक साधन संपत्तीचा दुरुपयोग
(३) वाढती लोकसांख्या
(४) प्राण्यांविषयी माणसाची अभिवृत्ती आणि माणूस त्यांना देत असलेली वागणूक
(५) पर्यावरण टिकवून धरण्यासाठी प्रयत्न व त्याबाबत मानवाची जबाबदारी

औद्योगिक क्रांती व विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या प्रगतीनंतर मानवी व समाज जीवनाचे नीती आधारित निकष बदलू लागले. त्यामध्ये लोकसंख्या व अर्थशास्त्रीय प्रणालींची भर पडून सबंध जगाचे व्यवहार मानवकेंद्री होऊ लागले. त्यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाधारित तथाकथित औद्योगिक प्रगतीची भर पडली त्यामुळे काही काळ मानवी जीवनात सुख येऊ लागल्याची चाहूल लागून मानवी समाज औद्योगिक प्रगतीकडे सुखी जीवनाचा रस्ता म्हणून पाहु लागला. त्यामधून सुखासक्ती वाढून मानवी समाजाने औद्योगिक क्रांती हाच एकमेव मानवी सुखी जीवनाचा आधार आहे असे मानून विज्ञान दृ तंत्रज्ञानाधारित औद्योगिक प्रगती केली खरी , त्यातून सबंध जग हे global villageम्हणून साकारले खरे , मानवी समाजाने अनेक सुखासीनतेच्या, उपभोगाच्या वस्तू प्राप्त केल्या खऱ्या परंतु त्या वस्तूंच्या प्राप्तीकरिता त्याला निसर्गाचा बळी घ्यावा लागला हे एकतर समजले नाही किंवा त्याने समजूनही दुर्लक्ष केले त्यामुळे त्याला आज विविध प्रकारच्या खालील प्रदूषणांचा सामना करावा लागत आहे कि ज्यामध्ये केवळ मानवी जीवनालाच धोका निर्माण झाला आहे असे नाही तर सबंध सजीव प्राणीमात्रांना या प्रदूपणाचा वेढा बसून मानवासह सजीव प्राणीमात्रांचे जीवन आज संकटात पडले आहे. या प्रदूषणाचा मानवाच्या आरोग्यावर, जीवनशैलीवर इतकेच नव्हे तर त्याच्या DNAवर देखील दुष्परिणाम

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

झाला आहे. त्यामुळे गर्भवती महिलांना आपल्या पोटी मनोशारीरिक विकृती असणारे मूल तर जन्माला येणार नाही ना याची सातत्याने भीती वाटत असते.

## प्रदुषणाचे विविध प्रकार :

प्रदूषण अनेक प्रकारचे असते. यामध्ये मृदा प्रदूषण, जलप्रदूषण, वायू प्रदूषण, ध्वनी आणि अन्न प्रदूषण इत्यादींचा समावेश होतो. वातावरणात पाण्यात, हवेत किंवा अन्नात सजीवांना हानिकारक असलेले पदार्थ मिसळण्याच्या क्रियेला प्रदूषण म्हणतात.

प्रदूषण म्हणजे जीवन नष्ट करू शकतील अथवा विस्कळीत करू शकतील असे घटक वातावरण, जल आणि भूप्रदेशात मिसळणे. उदाहरणार्थ, हवेमध्ये डीझेल या इंधनातून सल्फर असलेला धूर वातावरणात मिसळतो. यामुळे वातावरणात अतिउच्च असलेल्या ओझोन वायूच्या थराला हानी पोहचून सूर्यापासून निघणारी अतिनील किरणे पृथ्वीवर नको असताना पोहचतात. यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो आणि जीवनचक्र ढासळते. प्रदुषणाचे हे विविध प्रकार कोणत्या कारणांमुळे निर्माण होतात हे सर्वज्ञात आहे. म्हणून त्याची पुनरुक्ती याठिकाणी करीत नाही.

## वरील प्रदूषणांचा एकत्रित परिणाम :

वरील सर्व प्रदूषणाचा मानवी जीवनावर व पर्यायाने समाज जीवनावर अतिशय विकृत परिणाम होत आहे. हवा, पाणी, अन्न, जल हे तर मानवी जीवन जगण्यासाठीचे अनिवार्य घटक आहेत आणि मृदा ही मानवी जीवनाला लागणाऱ्या अन्न निर्मितीचा मूल स्त्रोत आहे. हवा, पाणी, अन्न, जल हे वरील विविध कारणांनी प्रदूषित झाल्यामुळे त्यांच्या सेवनामुळे मानवाला विविध संसर्गजन्य, दीर्घकाळ टिकून राहणारे तसेच जीवघेणे आजार होत असून त्यांचा दुष्परिणाम मानवी जीवनावर होत आहे हे आजचे कटू सत्य आहे. हवा प्रदूषणामुळे श्वसन संस्थेचे आजार, जल प्रदूषणामुळे पोटाचे, रक्ताचे व संसर्गजन्य आजार होतात. तसेच ध्वनी प्रदूषणामुळे मनोविकारांत वाढझाल्याचे दिसून येते. परिणामतः या सर्व आजारांमुळे मानवाची या आजारा विरुद्धची लढाई न संपणारी आहे ज्याचा त्याच्या दैनंदिन आणि एकंदरीत जीवनमानावर विपरीत परिणाम होत असतो.

विकास प्रक्रियेचा अटळ परिणाम मानले गेलेले कर्बोत्सर्जन आणि हरितगृह वायूंचे उत्सर्जन हा जगाच्या दृष्टीने आज डोकेदुखीचा विषय बनला आहे. कार्बन शोषून घेण्याची वातावरणाची क्षमता मर्यादित असतानाही व सोडलेला कार्बन वातावरणात वर्षानु वर्षे तसाच रहात असतानाही नव्याने त्यात आणखी कार्बनची प्रत्येक दिवशी भर पडत आहे. शिवाय कारखाने, रासायनिक प्रकल्प, विद्युत प्रकल्प, वाहने

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

यांच्यामुळे होणारे प्रदूषण त्यात भर घालत आहे. या प्रदूषणाचा एकत्रित परिणाम म्हणून निसर्गाचा समतोल ढळला असून निसर्ग नैसर्गिक संकटाद्वारा त्याची जाणीव करून देत आहे.

पर्यावरणीय नीतिशास्त्र ही तत्वज्ञानाची शाखा केवळ मानवी जीवन धोकादायक परिस्थितीतून जात असल्यामुळे निर्माण झालेली नाहीय तर त्याला पर्यावरणीय ऱ्हास जो नैसर्गिक साधन सामग्रीच्या अतिरेकी व अविवेकी वापरामुळे होत आहे त्यावर उपाय योजना करण्याच्या दृष्टीने ही शाखा निर्माण झाली आहे जी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीकोनातून नैसर्गिक साधन संपत्तीचे सबंध समाजाच्या अगदी सजीव व वनसंपत्तीसह सर्वांसाठी समान वाटपाची अपेक्षा करते. नैसर्गिक साधन संपत्तीचा ह्रास प्रामुख्याने मानवाची चुकीची अर्थनीती आणि उद्योग नीती यामुळे होत असल्याचे म्हणता येईल. त्याचबरोबर या साधन संपत्तीच्या वापरावर असलेल्या कायदेशीर निर्बंधांकडे दुर्लक्ष केल्यामुळे तसेच जगातील बलाढ्य राजकीय शक्तींनी नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरेकी वापर व औद्योगी कीकरणातून स्वयंचलनातून (utomation) अफाट वस्तू उत्पादन व वितरण याचा हव्यास धरल्यामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला आहे व तो अद्याप थांबलेला नाही. परिणामत: या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच नैसर्गिक साधन संपत्तीचा आवश्यक तेवढाच उपयोग करण्यासाठी व समान वाटप करण्यासाठी आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी नैसर्गिक साधन संपत्ती राखून ठेवून त्यांचे जीवनमान निरामय होण्यासाठी पर्यावरणीय नीतिशास्त्राचे उपयोजन आवश्यक झाले आहे. गेल्या ५० ते १०० वर्षांच्या तुलनेत जगाची लोकसंख्या काही पटींनी वाढली आहे परंतु त्या प्रमाणात नैसर्गिक साधन संपत्ती वाढली नसून उलट कमी झाली आहे. त्याचाही परिणाम पर्यावरण ह्रासावर होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे साधन संपत्तीचे योग्य व आवश्यक वापरासाठी पर्यावरण नीतिशास्त्र मार्गदर्शक ठरते.

प्रत्येक सजीव प्राणी हा परिसंस्थेचा भाग असून परीसंस्थेमध्ये त्याची विशिष्ट भूमिका ठरलेली आहे. ती पार पाडण्यासाठी त्या प्राण्यांचे वंश सातत्य टिकणे महत्वाचे आहे. परंतु मानवकेंद्री विचारांमुळे सर्व पशु ,पक्षी, प्राणी हे मानवाने स्वार्थासाठी वापरून त्यांचे वंश हि नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे अनेक प्राण्यांच्या प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. हे टाळण्यासाठी पर्यावरण नितीशास्त्राची बैठक किंवा पाया विकासनीतीला, उद्योगनीतीला व अर्थनीतीला असणे गरजेचे आहे.

## शाश्वत विकासाची संकल्पना :

अनिर्बंध विकासामुळे हि पृथ्वी व त्यावरील मानवजात नष्ट होऊ नये, मानवाच्या भावी पिढ्याही प्रदीर्घकाळ पृथ्वीवर सुखात नांदायला हव्यात हा विचार शाश्वत विकासाच्या संकल्पनेमागे आहे. त्यासाठी सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय अशा तीन स्तरांवर काम करण्याची गरज आहे. शाश्वत विकासाच्या मार्गावर वाटचाल करताना जगातील सामान्य माणसांच्या गरजांना प्राधान्य



324

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

मिळण्याची, सुयोग्य तंत्रज्ञानाचा वापर होण्याची गरज आहे. 'शाश्वत विकास' ही संकल्पना नैसर्गिक साधनांचा वापर करण्याची धोरणे निश्चित करणारा आणि तातडीची व स्थल काला पलिकडील मानवी पीढीला जिवंत ठेवणारी शाश्वतता प्राप्त करणारा राजमार्ग मानला जातो. संतुलित आर्थिक विकास आणि मानवी विकास साध्य होईल असे सामाजिक विकासाचे प्रारूप देणे हे उद्दिष्ट असते. पृथ्वीवरील नैसर्गिक जैविक व्यवस्थेतील एकात्मता, स्थैर्यता आणि सौंदर्य याचे संवर्धन व विकसन होईल असा विकास साधणे हे त्यामागील उद्दिष्ट असते. भविष्यकालीन पिढीच्या गरजा भागविल्या जाण्याच्या क्षमता कुठल्याही परिस्थितीत कमी होणार नाहीत , यासाठी कोणत्याही तडजोडी न करता ज्या विकास प्रतिमानात विद्यमान मानव जातीच्या गरजा पूर्ण होऊ शकतील असा विकास साधणे म्हणजे शाश्वत विकास होय. या व्याख्येत दोन सांकल्पनांवर भर देण्यात आला आहे. गरजा आणि मर्यादा. गरजा याचा अर्थ गरिबांच्या गरजा पूर्ण होण्याला कमालीचे प्राधान्य देणे. आणि मर्यादा म्हणजे विद्यमान आणि सद्यकालीन गरजांवर घातलेली बंधने स्वीकारणे. सारे जग ही एक व्यापक सुरचित व्यवस्था आहे. त्यामुळेच कोणत्याही भागातील प्रदूषण हे साऱ्या पृथ्वीचे असते आणि कोणतीही विद्यमान मानवी कृती ही भविष्यकालीन पिढीवर परीणाम करणारी असते हे वास्तव लक्षात घेऊन आपण आज त्यानुसार वागणे हे शाश्वत विकासाच्या संकल्पनेत निहीत आहे. जगणे गुणवत्तापूर्ण होण्यासाठी ते नियंत्रित, संयमित पण गरजा पूर्ण करणारे असावे य तृष्णा भागविणारे नव्हे. त्यामुळे शाश्वत विकासाची कल्पना आपले नाते इतरांशी, जगाशी, प्राणी, वनस्पती यांच्याशी कसे असावे याचे भान देते. मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी उपलब्ध साधनांचे विवेकी उपयोजन करणे यात अपेक्षित आहे. या दृष्टीकोनातून महात्मा गांधींनी भविष्यकालीन धोके ओळखून जगाला पर्यावरणीय नीतिशास्त्राचे धडे घालून दिले असे म्हणता येईल. पर्यावरण, निसर्ग याविषयी जगभरात निर्माण झालेली अलीकडच्या काळातील जागृती महात्मा गांधींच्या दूरगामी विचारांची आठवण करून देते.

## गांधीवादी पर्यावरण नीतिशास्त्र.

महात्मा गांधींनी पर्यावरण संरक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने आणि सर्व सजीवांच्या दृष्टीने खालील महत्वपूर्ण विचार शंभर वर्षांपूर्वी मांडले होते जे आजच्या परिस्थितीत तंतोतंत विचार आहेत.

१. अहिंसा व सत्य हे आचरणातून व्यक्त होत निसर्ग संवर्धन करता येते.

२. पृथ्वी प्रत्येकाच्या गरजा भागविण्या इतकी समर्थ आहे पण प्रत्येकाची लालसा भागविण्या इतकी ती समर्थ नाही.

३. विकासाचे युरोपिय मॉडेल स्वीकारले तर पृथ्वीवरील मानवाला सुखाने जगण्यासाठी पृथ्वीसारखे अनेक ग्रह लागतील.

४. नैसर्गिक संपत्तीचा मानव मालक नसून विश्वस्त आहे.

५. तंत्रज्ञानाधारित विकास विकासाची उत्पादने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याऐवजी तेथेच निर्माण करणे गांधींना अभिप्रेत होते. उदाहरणार्थ मुंबाईहून वीज वर्ध्याला नेण्याऐवजी ती वर्ध्यातच निर्माण करण्याबाबत त्यांचा आग्रह होता.

६. गांधींनी खादी व ग्रामोद्योग या संकल्पनांमधून ग्रामीण विकासावर भर देऊन शेती, कुटिरोद्योग व जोडधंदे, हस्तोद्योग यांना महत्व दिले. त्यामुळे ग्रामीण जनतेला गरजेच्या वस्तू स्थानिक पातळीवर शेत मालातून उपलब्ध होऊन त्यांच्या हाताला काम मिळून निसर्गाचा समतोल राखत प्रदूषणाला आळा घालण्याची ताकद दाखवून दिली होती. त्यामुळे गांधींनी शेतीला प्राधान्य दिले होते.

७. गांधी विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विरोधी कधीही नव्हते. विज्ञान तंत्रज्ञानाचा किमान वापर करून माणसाच्या किमान गरजा भागावाव्यात असे त्यांना वाटत होते. त्या दृष्टीने त्यांनी sophisticated technologyला विरोध केला होता.

८. गांधींनी चारचाकी वाहने, विमाने आदि हवा प्रदूषण मोठ्या प्रमाणात करणाऱ्या प्रवासाच्या साधनांना विरोध केला होता. तसेच त्यांच्या मोठ्या प्रमाणातील उत्पादनाला विरोध केला होता. ते किती दूरदृष्टीचे होते हे आजच्या परिस्थितीतील हवा प्रदूषण odd and evenव्यवस्था यावरून दिसून येईल.

९. भौतिक सुख व त्यात निरंतर वाढीसाठी शोध हे सैतानाचे रूप आहे. युरोपिअन लोकांनी भौतिक सुखाची गुलामगिरी झटकून टाकली नाही तर त्यांना पुढे त्या ओझ्याखाली गुदमरायला होईल असे त्याकाली गांधींनी धाडसाने सांगितले होते ते आज खरे होताना दिसत आहे.

१०. गांधींनी कायमच मितव्यय, संयम आणि साधे जीवन जगण्यास प्राधान्य दिले. वस्तूंचा जास्तीत जास्त उपभोग घेणे, त्यासाठी त्यांची सातत्याने निर्मिती करणे आणि चंगळवाद याला गांधींनी कायमच विरोध केला. त्यांचे हे ठाम मत होते की परस्परांबरोबर आणि निसर्गाबरोबर सौहार्दाने, सहकार्याने राहण्यामध्ये मानवाचे हित आहे. पर्यावरण नीतिशास्त्र मानवाला प्रकृती बरोबर सौहार्दपूर्ण व्यवहार करण्यास शिकविते. गांधीजींचे हे विचार वेदकालापासून भारतीय संस्कृतीत जतन केले जात आहेत. भारतीय संस्कृतीतील नद्या, डोंगर, झाडे, पाऊस यांना देवता मानून त्यांची करण्यात येणारी पूजा व प्रार्थना मानवाचे निसर्गाशी अतूट नाते असल्याचे दर्शविते व त्याचा संयमित उपभोग मानवासहित सर्व प्राणीमात्रांचे जीवन सफल करतो ही वेदोपानिषदांतील शिकवण आदर्श जीवन पद्धती दर्शक



326

**Akshar Wangmay(International Research Journal)**
**UGC CARE Journal**
*ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010*
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

आहे. त्यामुळे गांधीजींच्या या विचारांचे मूळ भारतीय संस्कृतीच्या शिकवणुकीत असल्याचे म्हणता येईल. मितव्यय व संयम यासंदर्भातही गांधीजींचे विचार "अर्थकामेष्वसक्तानां धर्मज्ञानं विधीयते'' या मनुस्मृतीतील वचनावर आधारित असल्याचे म्हणता येईल. कारण ज्यांना अर्थ व काम या प्रेरणांबद्दल अनासक्ती आहे तेच संयम व मितव्यय यांचे जीवनामध्ये पालन करू शकतात असे म्हणता येईल. यावरून असे दिसून येते कि भारतीय वेदोपानिषदे व भारतीय संस्कृतीची शिकवण यावर आधारित महात्मा गांधी यांची पृथ्वीवरील मानवासहित सर्व प्राणीमात्रांचे जीवन निरामय व सुकर करण्याच्या दृष्टीने प्रतिपादित केलेले पर्यावरणीय नीतिशास्त्र हे एक चिरंतन सत्य आहे.